THE MAGIC OF ROTARY

Rotary

Rotary Club of Pune Deccan Gymkhana
RID 3131
Club No: 63454

ROTARY CLUB OF PUNE DECCAN GYMKHANA

# DECCAN DIARIES

2024-25
September Edition
Editor-Rtn.Tanuja Kher

Rtn. Avinash Pendse
President

Rtn. Nitin Vibhute
Secretary

# EDITORIAL



Greetings to all Rotarians!
August comes from the Latin word Augustus, meaning "consecrated" or "auspicious.
Along with India’s Independence Day, August is full of festivals and celebrations. Usually, August parallels month Shravan, is also considered very auspicious. Rain showers, the greenery, and the festive season make August live. It sows the seeds of happiness and enthusiasm in everyone's mind.

RCPDG members also maintained the same zeal and organized and participated in various activities and programs. Let us get a sight of it.

Editor,
Rtn.Tanuja Kher.

आषाढ सरता येई श्रावण
बरसती धारा रिमझिम !
पाऊस रेखी पानांवर
अलवार नक्षी थेंबांची!
सोनसळी किरणे सूर्याची
त्यांना अलगद टिपून घेती!
हिरवी शाल ल्यायली धरणी
रंगीत पायवाट गवतफुलांची!
जाई हरखून अवघी  सृष्टी
आनंद मनमनात फुलवी!!
- रो. तनुजा खेर

# 1st day first program of the month




**This program is specifically designed to get to know the club member's personality, profession, interests, and future ambitions in Rotary. Rtn. Tanuja Kher and Rtn. Shubangi Pai shared their major life events and experiences.**



**Rtn. Shubangi Pai interviewed by Rtn Mamata Kolhatkar**



Rtn. Tanuja Kher interviewed by Rtn Mamata Kolhatkar



Dr. Ravi Kolte gave valuable information about blind-friendly devices which may turn into a useful project

# The second online BOD  18th August

**This time BOD meeting was held in online mode. Upcoming projects and programs were discussed in the meeting.**

९ ऑगस्ट रोजी सीमेवर असणाऱ्या जवांनाकरता
पाठवण्यात येणाऱ्या राखी पूजनाचा कार्यक्रम
दगडूशेठ यांचे दत्तमंदिर येथे झाला.








ज्ञानेश प्राथमिक शाळा,
बालाजीनगर, पुणे-४३.
सैनिक हो तुमच्या साठी

# Rakhi Purnima was celebrated with soldiers at The Queen Mary's Technical Institute For Disabled Soliders on 19th August





# Heart touching and memorable event of RCPDG



श्रावण महिन्यातील मंगळागौरीचे खेळ खेळण्याची आवड महिला वर्गाला असते. दरवर्षी प्रमाणे यंदाही आपल्या क्लबतर्फे मंगळागौरीच्या खेळांचे आयोजन केले आणि महिला सभासदांनी खूप उत्साहाने त्यात सहभाग घेतला.



Enthusiastic President Avinash & First Lady Anaghatai enjoyed Mangalagouri celebration in a traditional attire



मंगळागौरीचे खेळ खेळण्यात  रमलेल्या क्लबच्या महिला सभासद
२२ ऑगस्ट



# Tree Plantation  by our club members at Panshet





# वृक्षवल्ली आम्हा सोयरी ही उक्ती सार्थ ठरविण्यासाठी कार्यरत असलेले क्लबचे निसर्ग प्रेमी सभासद






कृष्ण जन्म किंवा दहीहंडी हा उत्सव सार्वजनिक पध्दतीने साजरा नाही करता आला तरी श्रीकृष्णाचे रूप भक्तांच्या सदैव मनात असते.याची प्रचिती देणारी  रो. ममता कोल्हटकर यांची कविता



आज साखर झोपेत श्रीकृष्ण माझ्या स्वप्नी आले
तेजस्वी ते रूप बघून डोळे माझे दीपले
मी गहिवरले मग सावरले
अन म्हणाले हे कृष्णा तुझी वाट बघून थकले सारे
सोडविणे आम्हा संकटातून कधी तू येशील रे -1-

तूच आमचं रक्षण करशील
वचन दिल्यानुसार पुन्हा जन्म घेशील
कृष्ण हसला आणि म्हणाला
अगं वेडे माझ्या चरित्रातून जेव्हा लोक शिकतील
तेव्हा प्रत्येक जण कृष्ण होईल
घरोघरी कृष्ण जन्मतील - 2 -

-

लहानपणी आम्ही सगळे सवंगडी जमत
गोपाल काला करून जेवत
केला का मी जातिभेद
शिकत नाही तुम्ही याचाच मला खेद
ऐक्यच नसेल तर सनातन धर्माची भिंत कशी राहिल अभेद - 3 -

दही दूध लोणी खाऊन
दंड बैठका अन् मुसळ फिरवून
कसदार शरीर कमावून
दृष्टांना केले मी शासन
आज तुम्ही मिळवळीत होऊन
नुसती वाट पाहत बसलाय मी येईन म्हणून - 4 -

मी गोवर्धन पुजायला सांगितला
कालियारूपी प्रदूषण काढून शुद्ध केले यमुनेला
सारा गोकुळ, वनचरे पशुपक्षी यात रमला
पर्यावरण रक्षणाचा हा धडा का नाही तुम्ही गिरवला? - 5 -

मी द्रोपदीचे रक्षण केले
नरकापुरीतून स्त्रियांना सोडविले
हेच गोडवे तुम्ही गात राहिलात
माझा आदर्श ठेवून
तुमच्यातील कृष्ण जागृत करून
माझे नेतृत्व गुण स्वीकारून
आई बहिणींच्या रक्षणा का नाही पुढे आलात? - 6 -

संभवामी युगे युगे म्हणजे
माझी शिकवण कायम तुमच्या सोबत असणार
जीवनाच्या समस्येत माझी गीता तुम्हाला मार्ग दाखवणार
चमत्काराच्या पुढे जाऊन माझा अभ्यास करावा लागणार
तुम्हालाच कृष्ण होऊन हाती सुदर्शन घ्यावे लागणार - 7 -

असेलच तुम्हाला माझा आधार
पण तुम्हालाच घ्यावा लागेल पुढाकार
तुमच्यातील सत्व जागृत करा
चैतन्य आणा अन्याविरुद्ध लढा पुकारा
माझे विचार, शिकवण धारण करा
निष्काम कर्मयोगाने केलेले तुमचे कार्य माझ्या चरणी अर्पण करा
माझ्या चरणी अर्पण करा - 8 -

**रो. ममता कोल्हटकर**